# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०६/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २०/०६/२००५ रोजी महिला व बालकल्याण सदस्यांची निवड करण्यासाठी तहकूब करण्यात आलेली महासभा दि. २०/०६/२००५ रोजी दुपारी ०१.०५ वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १०/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, तिसरा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| १०) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १२) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १५) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १६) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १७) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १८) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १९) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| २०) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २१) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २२) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २३) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २४) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २५) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २६) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २७) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २९) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| ३०) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| ३१) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३२) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३३) | श्री. माळी रविंद्र भीमदेव | गटनेता |
| ३४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३५) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३६) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |
| ३८) | श्रीम. पाटील अनिता जयंत | सदस्या |
| ३९) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४०) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४१) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४२) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४३) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४८) | श्री. मेंडोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४९) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ५०) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५२) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५३) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५५) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५६) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५७) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५९) | श्री. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६०) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६१) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६२) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६३) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६४) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६५) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६६) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६७) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६८) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |
| ६९) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७१) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७२) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७३) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## **गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ५) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |

## रजेचा अर्ज आलेले सदस्य

१) श्री. शहा शशिकांत रतिलाल सदस्य

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले.

**प्र. सचिव :-**

आता या ठिकाणी तहकुब सभेला सुरुवात होत आहे.

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांना मी पुन्हा एकदा नम्र विनंती करतो की सभागृहामध्ये जे चित्र आहे. हे चित्र दिसु नये. आपण अजूनपर्यंत सभागृहातील कार्यकाल व्यवस्थितपणे चांगल्या गुण्यागोविंदाने केलेला आहे. सर्व पक्षीय प्राधान्य दया. आरक्षणामध्ये महिलांना सर्व बाबतीत प्राधान्य आहे. त्याचा विचार करा आणि इथेसुध्दा तिच भुमिका घ्या अशी आम्ही आपल्याकडे नम्र विनंती करतो. मा. महापौर मॅडम, आपण स्वतः महिला आहात आपण याबाबत विचार करावा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य आणि गटनेते रतन पाटील यांना बीजेपीच्या सहकारी लोकांनी जाण करुन दिली. तेव्हा ते बोलायला लागलेले आहेत.

**रतन पाटील :-**

आम्ही आमची भुमिका आपल्याकडे मांडलेली होती. आपल्याला प्राधान्य मिळते म्हणून भुमिका मांडतो असे नाही. मतदान घेतले तर आम्हाला प्राधान्य मिळणार नाही हे आम्हाला माहिती आहे. आम्ही आपल्याकडे विनंती करतो की आमच्या सदस्या याव्यात. परंतु, आम्हाला प्राधान्य मिळणार नाही हे आम्हाला माहिती आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आपण विनंती केलेली आहे असे आम्ही समजतो.

**रतन पाटील :-**

आम्ही आमच्या पक्षाची भुमिका मांडलेली आहे. माझ्या पक्षाचा सदस्य यावा. मी माझी भुमिका मांडलेली आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आम्ही आपल्या विनंतीला मान दिलेला आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौरसाहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केलेली आहे. त्यांच्या सांगण्याचा अर्थ असा आहे की भाजपाच्या सन्मा. सदस्यांनी त्यांची विनंती मान्य करावी आणि जो विरोध केलेला आहे तो मागे घ्यावा.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे नाही. आपण काहीतरी वेगळेच बोलतात. मा. महापौरांना मी पुन्हा विनंती करतो.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौरसाहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी आपल्याला जी विनंती केलेली आहे. हीच विनंती त्यांनी भाजपाच्या सन्मा. सदस्यांना केली तर हयाच्याहून चांगले होईल. कारण त्यांनी कुठेतरी सामोपचाराने हा विषय संपविला तर ही परिस्थिती येणार नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, सभागृहामध्ये आपली संख्या मोठी आहे. हयाची आम्हाला कल्पना आहे. आपल्याकडे संख्याबळ भरपूर आहे हेही आम्हाला माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मा. महापौर मॅडम, गेल्यावेळेला जेव्हा महिला व बालकल्याण समितीचा विषय आला होता. त्यावेळेला मा. महापौरांच्या दालनामध्ये सर्व गटनेत्यांची बैठक झालेली होती. त्या बैठकीला उपस्थित असलेले दोन सन्मा. सदस्य आपल्यामधील आहेत. सन्मा. सदस्य मोहन पाटील, सन्मा. सदस्य लिओ कोलासो आणि सन्मा. सदस्य परशुराम पाटीलसुध्दा त्या बैठकीला होते. त्यावेळच्या मा. महापौरांनी सदस्य संख्या नउ असावी असा प्रपोजल ठेवला होता. परंतु,

पहिली कमिटी असल्यामुळे नेमकी सदस्य संख्या किती असावी हा वाद झाला. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना सदस्य संख्या पंधरा ते चौदा असेल असे वाटले. तर काही लोकांना आपण ठेवू तेवढी सदस्य संख्या असेल असे वाटले. परंतु, उपविधीमध्ये फक्त नऊ सदस्य संख्या होती. त्याच्यावरुन थोडा वाद झाला. मग पहिले असे ठरले की राष्ट्रवादीच्या तीन सन्मा. सदस्या, कॉंग्रेस (आय)च्या दोन सन्मा. सदस्या, अशा मिळून पाच सन्मा. सदस्या आणि प्रत्येक पक्षाची एक सन्मा. सदस्या घ्यायची असे ठरले होते. परंतु, हे ठरवतानाच सन्मा. सदस्य रोहिदास पाटील निषेध करुन उठून निघुन गेले. त्यामुळे मागच्या वेळेला त्या दोन पक्षाला प्राधान्य मिळालेले नव्हते. माझी आपल्याला अशी सुचना आहे की महिला व बालकल्याण समितीच्या शेवटी कल्याण हा शब्द आहे. आपण सर्वांनी मिळून त्या स्त्री या घटकाचे कल्याण केले पाहिजे. बालकल्याण असे त्याचे नांव आहे. आपण जर मन थोडे मोठे ठेवले आणि सर्व पक्षाला एक-एक करुन त्याच्यामध्ये समाविष्ट करुन घेतले तर एवढा मोठा आकांडतांडव करण्याची गरज नाही. आपण मन थोडे मोठे ठेवावे. नाहीतरी मागच्यावेळेला ही कमिटी तशी मोठी झालीच होती. आपण त्यावेळेला ठरविलेले होते. आपण काय नवीन करणार आहोत अशातला भाग नाही. परंतु, अनावधानाने किंवा काही गैरसमजातून दोन पक्षाच्या सन्मा. सदस्या त्या ठिकाणी आलेल्या नव्हत्या. ती गेल्या वर्षीची उणिव आपण हया वर्षी भरुन काढावी अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे. त्यानुसार आपण डिसीजन घ्यावा. आपले ते अधिकार आहेत. हा विषय समाप्त करुन टाकावा. प्रत्येक पक्षाला एक-एक दयावा.

**मा. महापौर :-**

सचिवांनी निवडणुक प्रक्रियेला सुरुवात करावी.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. १४ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल आणि अनुमोदन श्री. धनराज अग्रवाल यांचा आहे. दुसरा ठराव सुचक श्री. दिनेश नलावडे आणि अनुमोदन श्रीम. जेन्वी अल्मेडा यांचा आहे. मी नियमाप्रमाणे दुसरा ठराव मतदानाला टाकतो आहे. मी प्रथम ठरावाचे वाचन करतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४ करिता सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे व अनुमोदन श्रीम. जेन्वी अल्मेडा हयांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

(सदर ठरावासाठी मतदान प्रक्रिया सुरु करण्यांत आली.)

**प्रकरण क्र. १४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नउ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे

**ठराव :-**

प्रकरण पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला पालिका सदस्यांमधून ९ पालिका सदस्यांची नेमणूक ठरावाद्वारे करण्यात येत आहे.

**महिला व बालकल्याण समिती**

१) सन्माननीय नगरसेविका :- सौ. जयाबाई यशवंत भोईर
२) सन्माननीय नगरसेविका :- सौ. जिवी हिरा वाडे
३) सन्माननीय नगरसेविका :- सौ. उर्मिला कोमल भामरे
४) सन्माननीय नगरसेविका :- सौ. हेलन जॉर्जी गोविंद
५) सन्माननीय नगरसेविका :- सौ. सुरेखा यशवंत गायकवाड
६) सन्माननीय नगरसेविका :- सौ. मुक्ता प्रविण रांजणकर
७) सन्माननीय नगरसेविका :- सौ. गीता भरत जैन
८) सन्माननीय नगरसेविका :- सौ. शुभांगी सिताराम नाईक
९) सन्माननीय नगरसेविका :- सौ. नयना गजानन म्हात्रे

वरीलप्रमाणे महिला व बालकल्याण समिती (विशेष) सदस्यांची मुदत एक (१) वर्षाची राहिल. असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**प्र. सचिव :-**

सुचक श्री. दिनेश नलावडे आणि अनुमोदक श्रीम. जेन्वी अल्मेडा यांच्या ठरावाच्या बाजूने जे सदस्य असतील त्यांनी कृपया उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नांवे :-**

१) श्रीम. निर्मला बाबूराव सावळे
२) श्री. कोलासो लिओ इजिदोर
३) श्री. मोहन मधुकर पाटील
४) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
५) श्री. आसिफ गुलाब शेख
६) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
७) श्री. रोहिदास आत्माराम पाटील
८) श्री. पटेल आसीफ गुलाम
९) श्रीम. फॅरो ग्रीटा स्टिफन
१०) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी (शालू)
११) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
१२) श्री. गावंड आत्माराम बाळाराम
१३) श्री. सूर्यकांत अनंतराव भोईर
१४) श्री. केशव रामभाउ घरत
१५) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१६) श्रीम. जिवी हिरा वाडे
१७) श्रीम. जयाबाई यशवंत भोईर
१८) श्री. पाटील मिलन गोविंदराव
१९) श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
२०) श्री. ठाकूर नितीन गोपीनाथ
२१) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
२२) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२३) श्री. परशुराम दामोदर पाटील
२४) श्री. जयंत महादेव पाटील
२५) श्री. नरेंद्र मेहता
२६) श्री. रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
२७) श्रीम. गोहिल शानू
२८) श्रीम. जैन गिता भरत
२९) श्रीम. शाह रिटा सुभाष
३०) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
३१) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
३२) श्रीम. उमा विश्वनाथ सपार
३३) श्रीम. संगिता कैलाश पाटील
३४) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
३५) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
३६) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३७) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३८) श्री. डी.डी. नलावडे
३९) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे
४०) श्री. हंसु कमलकुमार पांडे
४१) श्री. शफीक अहमद खान
४२) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
४३) श्री. मिलन वसंत म्हात्रे
४४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन

ठरावाच्या बाजूने एकूण ४५ सदस्य आहेत. या ठरावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सदस्यांची नांवे :-**

१) श्री. रोहिदास शंकर पाटील
२) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
३) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
४) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
५) श्री. शरद केशव पाटील
६) श्री. सिंग मदन उदितनारायण
७) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
८) श्री. जैन रमेश धरमचंद
९) श्री. गोन्सालवीस जोजफ जॉन
१०) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
११) श्रीम. शाह रक्षा एस.
१२) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१३) श्रीम. भानु भगवान पाटील
१४) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१५) श्री. रतन कृष्णा पाटील
१६) श्री. पाटील अनंत रामचंद्र
१७) श्रीम. शुभांगी सिताराम नाईक
१८) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
१९) श्री. पाटील प्रफुल्ल काशीनाथ
२०) श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२१) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
२२) श्रीम. संगिता विजय म्हात्रे

ठरावाच्या विरोधात एकूण २२ सदस्य आहेत. प्रकरण क्र. १४ करिता जो पहिला ठराव आलेला आहे. तो ठराव मी आता मतास टाकतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४ करिता सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल आणि अनुमोदक श्री. धनराज अग्रवाल हयांनी दिलेल्या ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नउ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे

**ठराव :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नउ महिला सदस्यांची श्री. नलावडे यांनी मांडलेल्या ठरावात भाजपाच्या महिलांना प्राधान्य देण्यात आले नाही. या ठरावाचा आमचा विरोध असून ठरावाला मतदान घ्यावे आम्ही ठराव मांडत आहे.

**प्र. सचिव :-**

सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल आणि अनुमोदक श्री. धनराज अग्रवाल यांच्या ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे**

१) श्री. रोहिदास शंकर पाटील
२) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
३) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
४) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
५) श्री. शरद केशव पाटील
६) श्री. सिंग मदन उदितनारायण
७) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
८) श्री. जैन रमेश धरमचंद
९) श्री. गोन्सालवीस जोजफ जॉन
१०) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र

११)	श्रीम. शाह रक्षा एस.
१२)	श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१३)	श्रीम. भानु भगवान पाटील
१४)	श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
१५)	श्री. रतन कृष्णा पाटील
१६)	श्री. पाटील अनंत रामचंद्र
१७)	श्रीम. शुभांगी सिताराम नाईक
१८)	श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
१९)	श्री. पाटील प्रफुल्ल काशीनाथ
२०)	श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
२१)	श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
२२)	श्रीम. संगिता विजय म्हात्रे

या ठरावाच्या बाजूने २२ सन्मा. सदस्य आहेत. आता ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांनी उभे रहायचे आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेल्या सन्मा. सदस्यांची नावे :-**

१)	श्रीम. निर्मला बाबूराव सावळे
२)	श्री. कोलासो लिओ इजिदोर
३)	श्री. मोहन मधुकर पाटील
४)	श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
५)	श्री. आसिफ गुलाब शेख
६)	श्री. कुरेशी याकुब इस्माईल
७)	श्री. रोहिदास आत्माराम पाटील
८)	श्री. पटेल आसीफ गुलाम
९)	श्रीम. फॅरो ग्रीटा स्टिफन
१०)	श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी (शालू)
११)	श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
१२)	श्री. गावंड आत्माराम बाळाराम
१३)	श्री. सूर्यकांत अनंतराव भोईर
१४)	श्री. केशव रामभाउ घरत
१५)	श्रीम. अनिता जयवंत पाटील
१६)	श्रीम. जिवी हिरा वाडे
१७)	श्रीम. जयाबाई यशवंत भोईर
१८)	श्री. पाटील मिलन गोविंदराव
१९)	श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
२०)	श्री. ठाकूर नितीन गोपीनाथ
२१)	श्री. पाटील चिंतामण कमलाकर
२२)	श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२३)	श्री. परशुराम दामोदर पाटील
२४)	श्री. जयंत महादेव पाटील
२५)	श्री. नरेंद्र मेहता
२६)	श्री. रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
२७)	श्रीम. गोहिल शानू
२८)	श्रीम. जॅन गिता भरत
२९)	श्रीम. शाह रिटा सुभाष
३०)	श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
३१)	श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
३२)	श्रीम. उमा विश्वनाथ सपार
३३)	श्रीम. संगिता कैलाश पाटील
३४)	श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन

३५) श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
३६) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
३७) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३८) श्री. डी.डी. नलावडे
३९) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे
४०) श्री. हंसु कमलकुमार पांडे
४१) श्री. शफीक अहमद खान
४२) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
४३) श्री. मिलन वसंत म्हात्रे
४४) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४५) श्रीम. म्हात्रे नयना गजानन

**मा. महापौर :-**

सुचक सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे व अनुमोदन सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५ मते पडलेली आहेत आणि सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदन सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवाल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने २२ मते पडलेली आहेत. त्यामुळे सुचक सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे व अनुमोदन सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी आल्मेडा यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महिला व बालकल्याण समितीवर नउ महिला सदस्यांची ठरावाद्वारे निवड करणे

**ठराव क्र. १६ :-**

प्रकरण पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये महापालिका सदस्यांमधून ९ पालिका सदस्यांची नेमणूक ठरावाद्वारे करण्यात येत आहे.

**महिला व बालकल्याण समिती**

१) सन्माननीय नगरसेविका :- सौ. जयाबाई यशवंत भोईर
२) सन्माननीय नगरसेविका :- सौ. जिवी हिरा वाडे
३) सन्माननीय नगरसेविका :- सौ. उर्मिला कोमल भामरे
४) सन्माननीय नगरसेविका :- सौ. हेलन जॉर्जी गोविंद
५) सन्माननीय नगरसेविका :- सौ. सुरेखा यशवंत गायकवाड
६) सन्माननीय नगरसेविका :- सौ. मुक्ता प्रविण रांजणकर
७) सन्माननीय नगरसेविका :- सौ. गीता भरत जैन
८) सन्माननीय नगरसेविका :- सौ. शुभांगी सिताराम नाईक
९) सन्माननीय नगरसेविका :- सौ. नयना गजानन म्हात्रे

वरीलप्रमाणे महिला व बालकल्याण समिती (विशेष) सदस्यांची मुदत एक (१) वर्षाची राहिल. असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ४५ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २२ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०० |
| एकूण सदस्य | :- | ६७ |

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आता महिला व बालकल्याण समितीची निवडणुक झालेली आहे. याच्या दोन महिन्यापूर्वी प्रभाग समितीची निवडणुक झालेली आहे. परंतु, त्यांना कुठल्याही प्रकारचे अधिकार देण्यात आलेले नाहीत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता, आपण खाली बसून घ्या. हा विषय आता मिटींगमध्ये नाही. आपण हा विषय घेतल्यानंतर चर्चा करुया. आपण कृपा करुन बसा.

**नरेन्द्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, तसा विषय नाही. माझे म्हणणे असे आहे की आतापर्यंत प्रभाग समिती अध्यक्ष या नात्याने मला गाडी अजूनपर्यंत उपलब्ध झालेली नाही.

**मा. महापौर :-**

आता महासभेत हा विषय घेतलेला नाही. आपण सभा संपल्यानंतर हया विषयावर सविस्तर चर्चा करु.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, आता जी महिला व बालकल्याण समितीची निवड झाली. जो ठराव पास झाला त्याच्यामध्ये शिवसेनेच्यावतीने कोणत्या महिला सदस्या घेतल्या.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांना घेतलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

या ठिकाणी ठराव पास झालेला असताना त्यांचे नाव असूनही त्यांनी या ठरावाला विरोध केलेला आहे. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक या समितीत सदस्या होउ इच्छित नाहीत का? मग आपण बळजबरीने नाव घेतात का? हयाचा खुलासा हया सभागृहामध्ये व्हावा.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपल्या सन्मा. सदस्या शुभांगी नाईक या सदस्या असूनसुध्दा त्यांनी विरोध केलेला आहे. त्यांनी स्वतःने माघार घेउन दुस-यांचे नाव म्हणजेच आघाडी किंवा सहकारी पक्षाचे नाव सुचविले तर बरे होईल.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौरसाहेब, सन्मा. सदस्या जेन्वी अल्मेडा यांनी आपल्याकडे विनंती केलेली आहे. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांचे नाव सदर महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य पदी असताना त्यांनी सदर ठरावाला विरोध करुन त्यांचे या ठरावाला समर्थन आहे असे घोषित केलेले आहे तरी त्यांनी वेळ न घालवता त्यांच्या सहकारी पक्षाच्या सन्मा. सदस्याचे किंवा आघाडीच्या एखादया सन्मा. सदस्याचे नांव घोषित केले तर बरे होईल. अन्यथा ती जागा रिक्त ठेवावी आणि सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्रभात पाटील :-**

आपण हया एका विषयासाठी किती वेळ देणार आहात. त्याचा लवकरात लवकर निर्णय लावून टाका.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटील, हा विषय महिलांचाच आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक हया सन्मा. सदस्या असून त्यांनी विरोध केलेला आहे. म्हणजे त्यांचे नाव बाद करायचे आहे. हे ठिक आहे, योग्य आहे. आता या ठिकाणी असा डिसीजन झालेला आहे की ज्यांनी विरोध केलेला आहे त्यांचे नाव या कमिटीमध्ये आपण कसे घेणार? बीजेपी, शिवसेना, आघाडी या सर्वांनी विरोध केलेला आहे. मग तुम्ही त्याच्यामधून कोणाचे नाव घेणार नाही का? हया ठरावाला सर्वांनी विरोध केलेला आहे. मग तुम्ही कुठल्या सदस्याचे नांव घेणार.

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांचे नांव नाही. त्यांचे हया कमिटीवर नांव असूनसुध्दा विरोध केलेला आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की आता महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्यांची जी नांवे दिली. त्या नावांमध्ये उपसुचना आली. उपसुचना मताला टाकण्यात आली. त्यावेळी

ज्या सन्मा. सदस्याचे नाव दिलेले आहे. त्या सन्मा. सदस्या शुभांगी नाईक आहेत. त्यांचे नांव दिलेले आहे. त्यांनी स्वतःहून त्या ठरावाला विरोध केलेला आहे. आमचे असे म्हणणे आहे की त्यांनी आपले मत स्पष्ट करावे की मला माझ्या नावाचा विरोध आहे किंवा नाही. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांनी स्पष्ट करावे की माझे नांव दिलेले आहे, मी ठरावाला विरोधी मतदान केलेले आहे. तर माझे मत दिले आहे की नाही किंवा मला हे सदस्य पद मान्य नाही हे स्पष्ट करावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी एक गंमत सांगतो की एका मुलाचं लग्न जमत नव्हतं. ते जमवायला पुढारी मंडळी गेली. सगळे जमवून आले. बोहल्यावर चढवताना त्या मुलाला विचारतात की तुला मुलगी पसंत आहे का? असा प्रकार सन्मा. सदस्य मोहन पाटील करित आहेत. सन्मा. सदस्य मोहन पाटील तुम्हीच त्या समितीचे सदस्य ठराव मांडता, तुम्हीच उमेद्वार निवडता. तुम्ही उमेद्वार निवडताना विचारले नाही की तुम्हाला आमच्याबरोबर काम करायची तयारी आहे का? आणि आता सांगता की तुम्ही स्वतःहून सांगा मला गरज नाही. अहो, आमची लग्न जमवायचे असेल तर निदान आम्हाला विचारा तरी आता त्यांनी माघार घेतल्यानंतर सांगतात की आता आघाडीचे उमेद्वार आहात का? इतके संख्याबळ सत्ताधारींकडे आहे. त्या संख्याबळाच्या जोरावर आपण चांगला निर्णय घेउ शकतो. वेडयासारखे निर्णय घेउ नका.

**मोहन पाटील :-**

वेडयासारखा निर्णय नाही. सन्मा. सदस्या आणि गटनेते रतन पाटील यांनी संपर्क साधला होता.

**प्रफुल्ल पाटील :-**

हा वेडयासारखा निर्णय आहे. हे आम्ही या ठिकाणी सिध्द करु शकतो. आपण एवढया मेजोरिटीने आहात. चांगला निर्णय घेतला. आता तुम्ही पुन्हा तुमच्या निर्णयावर ठाम नाहीत. हा ठराव त्यांनी मांडलेला नाही. मा. महापौर मॅडम, हा ठराव जर त्यांनी मांडला असता तर त्यांनी जरुर मागे घेतला असता. आता तुम्हीच ठराव मांडलेला आहे. आता तुम्हीच त्याच्यावर दुरुस्ती सुचवा. तुमचा ठराव मागे घ्या. लग्न जमवायला तुम्ही गेला होतात आणि आता मोडायला आम्हाला कशाला सांगता.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी संपर्क साधला होता. त्या संपर्कामध्ये महापौर दालनामध्ये मी त्यांना विचारले की एस.एस.चे नांव आणि बीजेपीचे नाव. मागच्यावेळेला एस.एस.होती. बीजेपीचे नांव तुम्ही घेउ इच्छिता का? तर सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले हे माझे मत आहे. त्यांनी त्याच्यावर कॉमेन्टस केलेल्या नाहीत हे आमचे मत आहे. आम्ही तुम्हाला दिलेले आहे. या सदस्या व्हाव्यात ही आमची इच्छा आहे. आमचे असे म्हणणे आहे की सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील बोलले ते बरोबर आहे की लग्न जमवायला गेल्यानंतर तुम्ही सांगता की लग्न का जमले नाही? त्यांचे मत त्यांच्या ठिकाणी ते योग्य आहे. परंतु, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी याच्या अगोदर संपर्क साधला होता. मी त्यांना वाच्यता केली होती. त्याच्यावर सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी आम्हाला काहीही उत्तर दिलेले नाही. आमचे हे मत आहे की, सन्मा. सदस्या शुभांगी नाईकच आम्हाला सदस्या पाहिजेत असे त्यांनी आम्हाला सांगितले. त्यांनी त्याच्यावर कॉमेन्टस केलेल्या नाहीत. त्याच्याबद्दल मी काहीही बोलू इच्छित नाही. म्हणून मला एकच सांगायचे आहे की जर ठरावामध्ये सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांचे नांव आहे. त्यांच्याकडे जेवढी माहिती आहे. तर तेवढी माहिती त्यांनी आपल्याला सांगायला पाहिजे की माझे मत नाही. मला या समितीवर काम करायचे नाही किंवा करायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हया सभेमध्ये आमच्या गटनेत्यांनी म्हणजे भारतीय जनता पक्षाने आपल्यावर विश्वास ठेवला होता की मा. महापौरांना अधिकार आहेत. मा. महापौरांनी नावे डिक्लेअर करावी. आम्हाला मान्य आहे असे न करता असे वाटते की सत्ताधारी पक्षांनासुध्दा मा. महापौरांवर विश्वास नाही. नाहीतर आम्ही आपल्यावर विश्वास व्यक्त केलेला आहे. आपल्याला ठरावाची बाजू मांडायची गरज आली नसती.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, ही विरोधी पक्षाची लोक बेभानपणे बोलत आहे. मा. महापौर मॅडमवर विश्वास नाही असे कोणीही सांगितलेले नाही. हा यांचा जावईशोध आहे. काहीतरी बडबड करित आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव कसा मांडता हा महापौरांचा अधिकार आहे. ठराव मांडायची गरज नव्हती. मा. महापौरांनी डिक्लेअर केले असते बसलो असतो. ठराव मांडला याचा अर्थ सत्ताधारी पक्षाचा मा. महापौरांवर विश्वास नाही. आम्ही भारतीय जनता पक्षाने, विरोधी पक्षाने आपल्यावर विश्वास व्यक्त केलेला आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौरसाहेब, या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी ठरावा संदर्भात आपल्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक या समितीमध्ये सदस्या आहेत. त्या सदस्या असूनही त्यांनी ठरावाला विरोधी केलेला आहे. मला वाटते त्यांनी आपले आत्मचिंतन निश्चितपणे या ठिकाणी करायला पाहिजे, आत्मपरिक्षण करायला पाहिजे. हे नैतिकतेला धरुन नाही. त्यांनी या ठिकाणी त्यांची भुमिका क्लिअर करायला पाहिजे. त्या अडचणीत आल्या नसत्या. आमचे परममित्र, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांचे ऐकले नसते तर ते अडचणीत आले नसते. ऐकायचे असेल तर संजयचे ऐकले पाहिजे होते. आपण महाभारत बघितले की महाभारतात संजयचे ऐकल्यानंतर...........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमची युती आहे. आम्ही कुठेतरी ऐकणार. आम्ही प्रत्येक ठिकाणी तुमचे ऐकणार का?

**आसिफ शेख :-**

मी सन्मा. सदस्य रतन पाटील यांना बोललो. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांना विनंती करतो की त्यांनी औचित्याला धरुन नाही. परंतु, कृपया त्यांनी आत्मपरिक्षण करावे, मनन करावे, चिंतन करावे आणि या ठिकाणी आपला निर्णय जाहिर करावा.

**मा. महापौर :-**

महिला व बालकल्याण समितीची नुकतीच निवड झाली. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांचा विषय महासभेमध्ये चर्चेला आला. महिला सदस्याबाबतचा निर्णय अंर्तगत चर्चा केल्यानंतर हा निर्णय नंतर देण्यात येईल. तोपर्यंत पुढिल विषय घेण्यात यावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक मिनिट. मा. महापौर मॅडमनी अतिशय चांगला निर्णय दिलेला आहे. याचा अर्थ असा होतो

**मोहन पाटील :-**

विषय झालेला आहे. तुम्ही कोणत्या विषयावर बोलत आहात.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, एक मिनिट. ज्या अर्थी पीठासीन अधिकाऱ्यांनी निर्णय दिलेला आहे की सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांच्या सदस्यत्वाचा प्रश्न निकालात निघत नाही तोपर्यंत महिला व बालकल्याण समिती गठित झाली असे गृहित धरता येत नाही. धन्यवाद.

**लिओ कोलासो :-**

कृपया, निर्णयाचे इन्टरप्रिटेशन कोणीही करु नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग तुम्हीच करा.

**लिओ कोलासो :-**

ठराव बहुमताने पास झालेला आहे. तो त्या सदस्यांपुरताच आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठराव पास झाला असे वाटत असेल तर पीठासीन अधिकाऱ्यांनीच जाहिर करावे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही तुमचा सन्मान ठेवुन बोलतो की हा संपूर्ण अधिकार महापौरांचा होता. ज्या मास्तरच्या सुचनेवर तुम्ही चालतात ते मास्तर तुम्हाला चांगला सल्ला देत नाही. ते सगळे मास्तर पिंजऱ्यात अडकलेले आहेत. हया सभागृहाच्या कामकाज शास्त्राप्रमाणे आम्ही तुम्हाला अधिकार दिले होते. ते महापौरांचे अधिकार आहेत आणि तेच नियम आहेत. तुम्ही सांगायला पाहिजे होते की ही समिती जेव्हा ठराव मांडायच्या वेळेला उभे राहिले तेव्हा मी सांगितले की ही सिस्टीम नाही. तरी त्यांनी तुम्हाला सल्ला दिला की चालू दया. त्यांच्या हिशेबाने चालवायचे असेल तर तुम्ही चालवा. परंतु, हे कामकाज बरोबर नाही. हे पध्दतशीर नाही. तुम्ही आता निर्णय राखून ठेवला. निर्णय लागेपर्यंत आजचा निर्णय राखून ठेवला हे बरोबर आहे. त्याच्याबद्दल तुम्हाला धन्यवाद. त्यांचे ऐकू नका.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांच्याबद्दलचा निर्णय आपण राखून ठेवलेला आहे. पूर्ण समितीचा निर्णय या ठिकाणी राखून ठेवलेला नाही. समिती गठित झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

असे होउ शकत नाही.

**मोहन पाटील :-**

त्यांचा आपल्यावर विश्वास आहे. हा विश्वास दाखवित आहेत. त्यांचा विश्वास किती आहे ते बघा. कारण उपसुचनासुध्दा सन्मा. सदस्यांनी मांडलेली आहे. विश्वासपात्र असलेल्या सन्मा. सदस्यांनी उपसुचना मांडलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही हा ठराव पेन्डिंग ठेवू शकता. तुम्ही त्याच्यावर निर्णय घोषित करु शकत नाहीत. हे बरोबर आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

नगरसचिव, तुम्ही जरा बरोबर सल्ला दया. तुमच्याकडे विधी अधिकारी आहेत ना. पीठासीन अधिकारी आपल्याला विनंती करतो की कुठलाही ठराव जेव्हा आपण मतदानाला टाकतो. तेव्हा मतदानावर झालेला परिणाम हा परिणाम तुम्ही जोपर्यंत घोषित करत नाही तोपर्यंत त्या ठरावाला वैध रुप येत नाही. आता जर तुम्हाला असे सांगायचे असेल की सन्मा. सदस्या शुभांगी नाईक या सदस्या आहेत की नाही किंवा त्याच्याबद्दल निर्णय बाकी ठेवायचा आहे तर संपूर्ण ठराव हा अनअफेक्टेड राहिल. नगरसचिव, तुम्ही त्यांना सांगा. मॅडम नवीन आहेत. परंतु, तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे. त्यांना माहिती पडणार नाही अशातला भाग नाही. तुम्ही उलट एखादया सज्ञान आणि सुशिक्षित माणसाला मुद्दाम अज्ञानी बनविण्याचा प्रयत्न करता असा माझा तुमच्यावर आणि प्रशासनावर आरोप आहे. तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे की जेव्हा एखादा ठराव होतो. मतदान घेतले जाते. तेव्हा ठराव मंजुर आहे असा ठरावावर अंतिम निर्णय दिला जातो. जेव्हा तुम्ही असे सांगता की त्या ठरावातील एक पार्ट ॲप्लिकेबल नाही तेव्हा तो ठराव अवैध होतो. म्हणजे त्यांनी असे सांगायचे की हया ठरावावर जोपर्यंत त्यांच्या सदस्यत्वाचा निर्णय होत नाही. तोपर्यंत या ठरावावर पुढिल कारवाई स्थगित ठेवण्यात येत आहे. त्याहीपेक्षा मोठी गंमतीची बाब म्हणजे महापौर मॅडम, मी आपल्याला कुठेही कमी लेखत नाही. मी तुम्हाला कायदेशीर गोष्ट सांगितली की तुम्ही हयाच्यामध्ये असे म्हटले की त्यांच्या सदस्याबाबतचा वाद किंवा निर्णय होईपर्यंत ठेवला तर त्यांचे सदस्यत्व परत कोण ठरविणार? बालकल्याण समितीला ते अधिकार नाहीत. पुन्हा ते महासभेपुढे घ्यायला लागेल. म्हणजे आजचा विषय सगळा झाला तो पालथ्या घडयावर पाणी असे होईल. कृपया हयाच्यावर विधी अधिका-यांचे मत घ्या आणि नंतर सावकाश निर्णय दया.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांना पुन्हा एकदा विनंती करतो की त्यांचे गटनेते आणि आमचे परममित्र रतन पाटील यांना पुन्हा विनंती करतो की हे चुकीचे संदेश तुमच्या पक्षात जाता कामा नये. आपल्या पक्षाचा संदेश चांगला गेला पाहिजे. त्या दृष्टिकोनातून आम्ही या ठिकाणी आमची भावना व्यक्त केलेली आहे. आपण त्या भावनेकडे लक्ष दिले. मनन, चिंतन केले आणि चांगला संदेश नागरिकांपर्यंत गेला तर चांगले होईल. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक आणि सन्मा. सदस्य रतन पाटील यांना पुन्हा एकदा विनंती करतो की कृपया आपण आपला निर्णय जाहिर करावा आणि या विषयावर पडदा पाडावा.

**ज्युडी डिसोझा :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की जेव्हा मतदानाची प्रक्रिया झाली तेव्हा सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांनी एक क्षणही वेळ न लावता पटकन उभे राहून त्यांनी त्यांचा निर्णय दिला. आता सभागृहाची वेळ न घालवता त्यांनी लवकरात लवकर हयाचे उत्तर दयावे अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की एकदा ठराव पारित झाल्यानंतर त्या ठरावामध्ये माझे नांव मागे घेतले, माझे नांव पुढे घेतले हा विषय होत नाही. ही सर्व मतदान प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. ते सगळयांना ज्ञात आहे. परंतु, सभागृहामध्ये सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांचे नांव त्या यादीमध्ये आल्यानंतर आणि त्यांचे नाव यादीमध्ये आले ते संपूर्णपणे महापौर मॅडम आपल्याला गटनेते रतन

पाटील यांनी त्यांच्या विनंतीपत्राद्वारे आपण त्यांचे नाव घेतलेले होते. त्यांनी आमचे नावे घ्यावी अशी विनंतीदेखील केलेली होती. त्या विनंतीला मान देउन आपण त्यांचे नांव घेतले त्याबद्दल आपले धन्यवाद. परंतु, सहकारी पक्षाने बीजेपी या सहकारी पक्षाने आपल्यावर अति विश्वास दाखविला आणि त्यांनी सांगितले की उपसुचना मांडून मतदान घ्यावे. त्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो. कारण त्यांनी आमचा तुमच्यावर विश्वास नाही असे या ठिकाणी सांगितलेले आहे. खरोखर त्यांच्या विश्वासावर आपण हे सभागृह चालवितो. त्याबद्दल त्या दोघांनाही आम्ही धन्यवाद देतो. या ठिकाणी सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांनी आपले नांव असूनसुध्दा त्या ठरावाला विरोध दर्शविला. तटस्थ राहिलेल्या नाहीत. विरोध दर्शविला त्या विरोधामुळे त्यांना या समितीमध्ये काम करण्याची इच्छा बिलकुल नाही असे त्यांचे स्वतःचे वैयक्तिक मत आहे. परंतु, त्यांच्या युतीचे सहकारी पक्ष बीजेपी, शिवसेना व अन्य सदस्य त्यांना चांगल्या पध्दतीने मार्गदर्शन करतात. त्या मार्गदर्शनामुळे त्या बोलायला धजावत नाहीत असे चित्र या ठिकाणी दिसत आहे. मा. महापौर मॅडम, मी त्याबद्दल त्यांना धन्यवाद देईन. कारण त्यांनीही कोणत्या पध्दतीने बोलावे हा विषय आहे. कारण सोडलं तर पळतयं आणि धरलं की चावतयं अशी त्यांची अवस्था झालेली आहे. आम्ही त्यांना विनंती करतो की त्यांचे नाव यथोचित ठेवावे आणि हा विषय संपवून पुढच्या विषयाला सुरुवात करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की सन्मा. सभापतीसाहेब यांनी छानपैकी वक्तव्य केले. आम्हाला अन्य पक्षाकडून मार्गदर्शन मिळत आहे. मार्गदर्शन हे कधीही वाईट नसते. मार्गदर्शन घ्यावे. कोणाचे ऐकावे. परंतु जे करायचे आहे. आम्ही ते करणार आहोत, आमच्यापरीने करणार आहोत. तो निर्णय घ्यायचा आहे. हेसुध्दा सभापतींना ठामपणे सांगतो. आम्ही कोणाचे ऐकत नाही. आम्हाला प्रत्येकजण वेगवेगळे सांगतो. आपण ठराव केलेला आहे. ठराव झालेला आहे. आम्ही आपल्याकडे मा. महापौरांना विनंती केलेली आहे. आम्ही तसे रितसर लेटर दिलेले आहे की मागच्यावेळेला जशा पध्दतीने सन्मा. सदस्या शुभांगी नाईक यांना घेतले तशीच हयावेळेलासुध्दा त्यांची निवड व्हावी अशी आम्ही मा. महापौरांकडे विनंती केली, आपल्याकडे विनंती केली. आपण दालनात बसले होते. आम्ही तिथे बोललो की सन्मा. सदस्या म्हणून हयांची निवड व्हावी. त्याच्यामध्ये काही गैर नाही. ठराव झालेला आहे. सगळे झालेले आहे. ठरावाच्या संदर्भात आम्ही कोणाच्या नावाला विरोध केलेला नाही. तुम्ही अमुक नांव आहे. आम्ही त्या नावाला विरोध केलेला नाही. तुमची ही वाटप पध्दत आहे. हयाला फक्त आम्ही विरोध दर्शविलेला आहे. बाकी दुसरे काही नाही. ज्या मा. महापौरांनी संबंधित ठरावावर निर्णय घ्यायचा आहे. इथे आमच्या सन्मा. सदस्या आहेत. त्यांना ठेवायचे आहे किंवा ठेवायचे नाही हा निर्णय आपण घ्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आपण बोलण्यापूर्वी मी सभागृहाला तेच सांगितलेले आहे. मी मा. महापौर मॅडमना विनंती केली की त्यांचे नांव यथोचित राहू दे. त्यांना त्यांची स्पष्ट भुमिका मांडता येत नाही. आम्ही बोललो त्यांचे नांव राहु दे. हा विषय संपवून पुढचा विषय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

हयाच्यामध्ये ते स्थायी समितीचे सभापती आहेत. पहिले काय बोलले ते त्यांच्या लक्षात राहत नाही. त्यांच्या सन्मा. सदस्यांनी काय बोलले तेही त्यांच्या लक्षात राहत नाही. हा विषय इकडच्या लोकांचा नव्हता. तुम्ही जाहिर केले. तुमचा निकाल जाहिर झाला. राष्ट्रवादी पक्षाच्या सन्मा. सदस्यांनी तो विषय आणला की ज्यांनी विरोधी मतदान केलेले आहे. त्यांना ठेवायचे आहे की ठेवायचे नाही. ब-याच विचारांचे मंथन झाल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की आपण कुठेतरी चुकलेले आहोत. ते दुस-यावर ढकलायचे कारण नाही. तुम्हाला सद्बुध्दि सुचली असेल तर आता तुमचा निर्णय राखून ठेवलेला आहे. तो तुम्हाला परत फिरवता येणार नाही. तुम्ही त्याचे रुलिंग दिलेले आहे. तुम्हाला संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत एकच विषय चालवायचा असेल तर चालवा. परंतु, मी हा निर्णय राखून ठेवलेला आहे असे तुम्ही रुलिंग दिलेले आहे. आमचे म्हणणे असे आहे की तो जो निर्णय राखून ठेवलेला आहे. तो संपूर्ण निकालाचा निर्णय राखून ठेवलेला आहे. अजून त्यांना आठवायला लागेल. आता पहिले काय बोलले, दुसरे काय बोलले, आता मघाशी काय बोलले तेही त्यांना आठवणार नाही. आठवा आणि परत बोला.

**मा. महापौर :-**

ठरावाप्रमाणे महिला व बालकल्याण समिती गठित झालेली आहे असे मी जाहिर करते.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण असे करु शकत नाही. पीठासीन अधिकाऱ्यांनी रुलिंग दिले की, मी हे पेन्डिंग ठेवलेले आहे. तुमचे रुलिंग असे प्रत्येक मिनिटाला फिरवणार असाल तर तसे आम्हाला सांगा. मग ते सभागृह त्या पध्दतीने चालेल. परंतु, असे चालणार नाही. तुम्ही रुलिंग दिले त्याचा अर्थ काय आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

एकदा ठराव झाल्यानंतर तो परत बाधित करता येत नाही. तो ठराव झालेला आहे. तो बरोबर झालेला आहे. ते सदस्य झालेले आहेत. नंतर चर्चा करायला नको. मा. महापौर मॅडम, मी तुम्हाला हया सभेत धन्यवाद देतो. कारण मघाशी जेव्हा सन्मा. सदस्य नरेंन्द्र मेहता बोलायला उठले. ज्याप्रमाणे तुम्ही त्यांना आज प्रथम बसायला सांगितले. तुम्ही असेच बोलत रहा. कडक वागल्याशिवाय हे सभागृह चालणार नाही. त्याचप्रमाणे मघाशी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनीसुध्दा एक चुक केलेली आहे की मास्तर हा शब्द चुकीचा आहे. त्यांना मास्तरची गरज नाही. त्या पीठासीन आहेत. त्यांनी निर्णय दयायचा असतो.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना जे मार्गदर्शन करतात. त्यांचे बोलतो. तो विषय जाउ दे. नक्की निर्णय काय झालेला आहे.

**मा. महापौर :-**

समिती गठित झालेली आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मी मा. महापौरांचे अभिनंदन करतो. सदर मोरबे धरणातून मिरा भाईंदरला पाणी मिळावे. यासाठी जो प्रस्ताव आलेला आहे. मा. महापौरांनी तो प्रस्ताव हया महासभेत आणल्याबद्दल मा. महापौरांचे, मा. आयुक्तांचे, मा. पीठासीन अधिकाऱ्यांचे आणि सभागृहाचे मी हार्दिक आभार व्यक्त करतो.

**अभिनंदन ठराव क्र. १६(अ) :-**

मा. पालकमंत्री, आदरणीय गणेश नाईकसाहेब यांनी मिरा भाईंदर हा माझ्या अखत्यारित असलेला भाग असल्यामुळे त्या मतदार संघामध्ये पाण्याची पूर्तता करण्यात यावी अशी माझीसुध्दा धारणा आहे. त्याकरिता आदरणीय गणेश नाईकसाहेबांनी संपूर्ण प्रयत्न करुन आपल्याला त्यावेळेला आश्वासन दिलेले होते. प्रशासनाने त्यांच्याशी जो संपर्क साधला त्यावेळी आपल्याला १०० एम.एल.डी.पाणी दयावे किंवा देण्यात यावे असे उत्तर आपल्याला दिलेले आहे आणि आपल्याला असे उत्तर नवी मुंबईकडून आलेले आहे. त्याबद्दल आदरणीय गणेश नाईकसाहेब यांच्या अभिनंदनाचा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.　　　　अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, आपण सर्वप्रथम या सभागृहामध्ये अत्यंत महत्वाचा विषय विषयपटलावर आणला. त्याबद्दल आपले सभागृहाच्यावतीने मी हार्दिक धन्यवाद व्यक्त करतो. काही वर्षापूर्वी पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची अवस्था आपल्या शहरवासियावर आलेली होती. परंतु, मधल्या काही काळामध्ये आपली जी योजना कार्यान्वित झाली तशाप्रकारचा प्रसंग सध्या तरी दिसत नाही. परंतु, भविष्याकाळाची गरज लक्षात घेता महापालिकेला येत्या नजीकच्या काळामध्ये लवकरात लवकर ताबडतोब वाढीव अतिरिक्त पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी आपण हा विषय सभागृहासमोर आणलेला आहे. मी या ठिकाणी ठराव मांडतो.

**जयंत पाटील :-**

मी ठरावाला अनुमोदन देत आहे. तत्पूर्वी दि. ५/२/२००५ रोजी मा. पालकमंत्रीसाहेब यांचा मिरा भाईंदरमध्ये जनता दरबार भरलेला होता आणि त्या जनता दरबारामध्ये मी त्यांना हयाच विषयावर पत्र

दिलेले होते. त्याचे उत्तरदेखील मला पालिकेकडून आलेले आहे. मला सांगायला आनंद होतो की माझ्या पत्राला अनुसरुन हा विषय या ठिकाणी आलेला आहे. खासकरुन आपण गणेश नाईकसाहेबांच्या अभिनंदन ठराव या ठिकाणी केला पाहिजे. त्यांनी त्यांच्या निवडणुकीच्या काळामध्ये आपल्याला, मिरा भाईंदरमधील जनतेला आश्वासन दिलेले होते की मोरबे धरणातून जे पाणी मिळेल त्या पाण्याचा काही हिस्सा निश्चितच मिरा भाईंदरच्या जनतेला देण्यासाठी मी आवश्यक प्रयत्न करेन. आपण हया ठरावाचा ताबडतोब फॉलो अप करुन घ्या आणि आपण त्यासंबंधी ज्या-ज्या काही गोष्टी सांगितलेल्या आहेत. म्हणजेच वाशी, नवी मुंबई महापालिकेकडून आपल्याला ज्या-ज्या माहितीची आवश्यकता आहे. ती माहिती ताबडतोब घेउन आपल्याला लवकरात लवकर पाणी कसे मिळू शकेल यासाठी आपण अवश्य प्रयत्न करावे आणि या ठरावाला माझे अनुमोदन आहे असे मी जाहिर करतो.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई शेजारी असूनस औद्योगिकरणामुळे शहरामध्ये रोजगारानिमित्त येणा-या लोकांची संख्या झपाटयाने वाढत आहे. सन १९९१ शहराची लोकसंख्या १.७५ लक्ष वरुन ती सन २००१ साली ५.२७ लक्ष इतकी झाली. यावरुन लोकसंख्या वाढीचा दर सुमारे २०० टक्के एका दशकात झाला आहे. देशातील इतर शहरांच्या तुलनेने लोकसंख्या वाढीचा सरासरी दर केवळ २० टक्के अपेक्षित आहे. आजमितीस शहराची लोकसंख्या ७.५० लाखापेक्षा जास्त असून शहराचे झपाटयाने नागरीकीकरण होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात येउन तीन वर्षे झाली असून नागरिकांना मुलभूत नागरी सुविधी पुरविणेसाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे.

मिरा भाईंदर शहराला स्वतःचा जलस्त्रोत उपलब्ध नाही व निर्माण होणेही नजिकच्या काळात शक्य वाटत नाही. सध्या स्टेम प्राधिकरणाकडे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ८१ दललि प्रतिदिन पाणी आरक्षण असून, स्टेम प्राधिकरणाकडून मिळणा-या ८१ दललि पाण्याचे कौशल्याने व चोख व्यवस्थापन करुन नागरिकांना वितरित करणेत येत आहे.

सध्या स्टेम प्राधिकरणाकडून मिळणारे ८१ दललि पाणी सद्यस्थितीत नागरिकांना पुरेसे होत असले तरी प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या विचारात घेता, येत्या एक-दोन वर्षात नक्कीच पाणी पुरवठा कमी पडणार असून शहराच्या दृष्टिने ही चिंताजनक बाब आहे. सध्या मिळणारे ८१ दललि पाणी आजच्या ७.५० लक्ष नागरिकांना पुरेसे होत असले तरी सन २०११ मध्ये वाढीव लोकसंख्येसह सुमारे २०० दललि व सन २०२६ मध्ये सुमारे २०.०० लक्ष लोकसंख्येसाठी २५६.०० दललि पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून वाढीव लोकसंख्येबरोबर जास्तीच्या पाण्याची आवश्यकता असल्याने स्टेम प्राधिकरणाकडे तातडीने अतिरिक्त २५ दललि वाढीव पाण्याची मागणी करणेत आली होती. परंतु, स्टेम प्राधिकरणाकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध नसल्याने त्यांनी कळविले आहे. तसेच नजीकच्या मुंबई महानगरपालिकेला प्रतिदिन ४००० दललि पाण्याची आवश्यकता असताना सध्या ३००० दललि पाणी त्याचेकडे उपलब्ध असल्याने त्यांचेकडूनही पाणी उपलब्ध होईल असे वाटत नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेने नुकतेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून ४५० दललि क्षमतेचे मोरबे धरण मालकी तत्वावर स्वतःकडे घेतले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेची पाण्याची गरज भागवून त्यांचेकडे अतिरिक्त असलेले १५० दललि पाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळावे म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेकडे मागणी करणेसाठी व सदर कामाची तांत्रिक अनुषंगिक कामे पार पाडणेसाठी सल्लागार नेमण्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर ठरावास महासभा मंजुरी देत असताना आदरणीय पालकमंत्री मा. ना. गणेशजी नाईक साहेब यांचे सदर कामी अत्यंत मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे त्यांना ही महासभा खास धन्यवाद देउन त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा करित आहे.

**सुचक :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदक :- श्री. जयंत पाटील.**

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव मांडत असाल तर मलासुध्दा ठराव मांडायची परवानगी देण्यात यावी.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महापालिकेस नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होणेबाबत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई शेजारी असून औद्योगिकरणामुळे शहरामध्ये रोजगारानिमित्त येणाऱ्या लोकांची संख्या झपाटयाने वाढत आहे. सन १९९१ ची लोकसंख्या १.७५ लक्ष इतकी होती. ती सन २००१ साली ५.२७ लक्ष इतकी झाली. यावरुन लोकसंख्या वाढीचा सरासरी दर केवळ २० टक्के अपेक्षित आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात येउन तीन वर्षे झाली असून नागरिकांना नागरी सुविधा पुरविणेसाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे.

मिरा भाईंदर शहराला स्वतःचा जलस्त्रोत उपलब्ध नाही व निर्माण होणेही नजिकच्या काळात शक्य वाटत नाही. सध्या स्टेम प्राधिकरणाकडे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ८१ द.ल.लि. प्रतिदिन पाणी आरक्षण असून, स्टेम प्राधिकरणाकडून मिळणा-या ८१ द.ल.लि. पाण्याचे कौशल्याने व चोख व्यवस्थापन करुन नागरिकांना वितरित करणेत येत आहे.

सध्या स्टेम प्राधिकरणाकडून मिळणारे ८१ द.ल.लि. पाणी सद्यस्थितीत नागरिकांना पुरेसे होत असेले तरी प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या विचारात घेता येत्या एक-दोन वर्षात नक्कीच पाणी पुरवठा कमी पडणार असून शहराच्या दृष्टिने ही चिंताजनक बाब आहे. सध्या मिळणारे ८१ द.ल.लि. पाणी आजच्या ७.५० लक्ष नागरिकांना पुरेसे असले तरी सन २०११ मध्ये वाढीव लोकसंख्येसह सुमारे २०० द.ल.लि. व सन २०२६ मध्ये सुमारे २०.०० लक्ष लोकसंख्येसाठी २५६.०० द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून वाढीव लोकसंख्येबरोबर जास्तीच्या पाण्याची आवश्यकता असल्याने स्टेम प्राधिकरणाकडे तातडीने अतिरिक्त २५ द.ल.लि. वाढीव पाण्याची मागणीस करणेत आली होती. परंतु, स्टेम प्राधिकरणाकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध नसल्याने त्यांनी कळविले आहे. तसेच नजीकच्या मुंबई महानगरपालिकेला प्रतिदिन ४००० द.ल.लि. पाण्याची आवश्यकता असताना सध्या ३००० द.ल.लि. पाणी त्याचेकडे उपलब्ध असल्याने त्यांचेकडून पाणी उपलब्ध होईल असे वाटत नाही.

मा. गणेशजी नाईक पालक मंत्री यांनी वेळोवेळी नवी मुंबईच्या मोरबे धरणातून मिरा भाईंदरला पाणी देण्याचे कबुल केलेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने नुकतेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांकडून ४५० द.ल.लि. क्षमतेचे मोरबे धरण मालकी तत्वावर स्वतःकडे घेतले आहे. नवी मुंबई महानगरपालिका पाण्याची गरज भागवून त्यांचेकडे अतिरिक्त असलेले १५० द.ल.लि. पाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेस मिळावे.

अशी मागणी नवी मुंबई महानगरपालिकेकउे करावी. तसेच ही मागणी पूर्ण करुन घेण्यासाठी व तांत्रिक कामाची पूर्तता करण्यासाठी आपणाकडे असलेली सी.टी. इंजिनियर (सक्षम अधिकारी) यांना नेमावे व त्यांच्याकडून कामे पूर्ण करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रियांका करंबेळे.** **अनुमोदक :- श्री. रतन पाटील.**

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की ठराव झालेला आहे, अनुमोदन झालेले आहे. सभागृहामध्ये कोणाचाही विरोध नाही. मा. सभापतींना सांगतो की आमचासुध्दा विरोध नाही. परंतु, आम्ही ज्यासाठी प्रयत्नशील आहोत. आम्ही या मिरा भाईंदरला संभाव्य वाटणा-या लोकसंख्येच्या मानाने पाणीपुरवठा परत दुसरी पाणी योजना किंवा जास्त पाणी मिळावे अशी योजना आपल्याला करणे गरजेचे आहे. यासाठी महापालिका, प्रशासन आणि मंत्रालयातून नेहमी पाठपुरावा करित आलेले आहोत. आज आता ते स्वप्न साकार होत आहे. आपण किती पत्रव्यवहार केला, काय केले त्याला आपण श्रेय देत आहोत. परंतु, आम्ही जे करतो म्हणून आम्ही हे आपल्याकडे मांडतो. आज ठराव झालेला आहे. मी या ठिकाणी ठरावाचे वाचन करतो :-मिरा भाईंदर महानगरपालिकेस नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होण्याबाबत. मिरा भाईंदर महापालिका मुंबई शेजारी असून औदयोगिकीकरणामुळे शहरामध्ये रोजगाराच्या निमित्ताने येणा-या लोकांची संख्या झपाटयाने वाढत आहे. ही इतकी लोकसंख्या व त्याचबरोबर या मिरा भाईंदरमध्ये बिल्डिंगसुध्दा वाढत आहेत. आज सन १९९१ ची लोकसंख्या १ लाख ७५ दशलक्ष इतकी होती. मा. महापौरांच्या परवानगीने मी सुचना मांडलली आहे. मी नागरिकांच्या प्रश्नाबाबत बोलतो की महानगरपालिकेचे एक शिष्टमंडळ घेउन नवी मुंबई महानगरपालिकेत जाउन अधिका-यांनी पाहणी करावी अशी मी सुचना मांडतो.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त(मु.)):-**

सदरच्या विषयाबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने या संदर्भात पत्रव्यवहार केला होता की मोर्वे प्रकल्प धरणामध्ये मागणीपेक्षा सुमारे दशलक्ष पाणी नवी मुंबई एवढे पाणी उपलब्ध करुन देउ शकते.

त्यामुळे योग्य ते किती प्रमाणात पाणी उपलब्ध करुन देउ शकतील ते आम्हाला लेखी कळवावे असे कळविले आहे. (पत्राचे वाचन केले.)

**प्रकाश दुबोले :-**

पाणी मिळविण्यासाठी आपले प्रयत्न चालू आहेत आणि हा पाण्याचा प्रश्न आहे. पण येथे तांत्रिक सल्लागार नेमण्याविषयीचा प्रश्न आला आहे. आपल्या येथे याकरिता सिटी इंजिनियर आहेत. जोपर्यंत येथे तांत्रिक सल्लागाराची निवड होत नाही तोपर्यंत सिटी इंजिनियरसाहेबांनी हया विषयावर अभ्यास करुन तसा प्रस्ताव सादर करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. उपायुक्तसाहेबांनी जे पत्र सभागृहात वाचून दाखविलेले आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने पाणी पाहिजे असे आहे. पण हयात काहीतरी विसंगती वाटते की आपण ठराव केला पाहिजे पण आपण ठराव काय करतो तर तांत्रिक सल्लागार नेमणे. महानगरपालिका होउन अडीच वर्षे झाली आणि जेव्हा पालकमंत्री महोदयांनी बेस्टची सोय व्हायला पाहिजे असे सुचविल्यानंतर आपणाकडून परिवहन समिती गठीत होते. पालकमंत्री हे आपल्याकडे चांगला प्रस्ताव आणतात. त्यांच्या प्रस्तावावर कुठेतरी लक्ष दयायला पाहिजे. त्यांनी आरक्षित करुन पाण्याचा प्रस्ताव आपल्यासमोर आणाला आणि आपण ठराव काय करता. तांत्रिक सल्लागार नेमण्याचा. जे पालकमंत्री सांगतात. त्याप्रमाणे आम्ही काम करतो असे दर्शविले जाते. जर त्यांनी सांगितल्याप्रमाणे काम करायचे असते आरक्षणाचा ठराव पाहिजे नाहीतर त्याच्यावर आम्ही ठराव मांडतो. पहिल्यांदा जेवढे पाणी आहे तेवढे पाणी आरक्षित करावे ही महत्वाची बाब आहे. मा. पीठासीन अधिकारी तथा मा. महापौर मॅडम आपल्याकडे एक योजना राबविली असे त्यावरुन समजते. सगळयांनी काम केलेले आहे. परंतु, सत्ताधा-यांना कधी वाटले नाही की आपण याबाबत सन्मा. सदस्यांबरोबर चर्चा घडवावी. विरोधी पक्ष असला तरी त्यांना सांगावे आणि सभा घ्यावी असे झाले नाही आणि असे जर झाले असेल तर आपण आम्हाला सांगावे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य जे बोलतात.......

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सभागृहनेते, आपण माझा प्रश्न ऐका. नंतर आपल्याला काय उत्तर दयायचे आहे ते दया. माझे बोलून झालेले नाही. मी येथे चुकीचे आरोप करित नाही. जर माझे आरोप चुकीचे असतील तर मी आपली क्षमा मागतो. माझा पहिला आरोप असा आहे की ५ एम.एल.डी. स्कीममध्ये जे संम्प बाकी आहेत. त्याचे काय करावे? घोडबंदरच्या येथे संम्प आहे. त्याबाबत मागच्या सभेमध्ये मा. उपमहापौरसाहेबांनी मागणी केली होती. घोडबंदरच्या येथील संम्प अजूनही सुरु झाला नाही. तो वर्षभरात सुरु करावा. परंतु, तो कधी सुरु करण्यात येईल याची जर माहिती असेल तर ती सभागृहाला जरुर दयावी. ५० एम.एल.डी. संम्पचा जर विचार करता तर तुम्ही पाणी वाटप कधीही करणार नाही. जर ५० एम.एल.डी. मध्ये किती झोन आहेत. ५० एम.एल.डी. चे १४० लिटर पाणी सर्वांना मिळाले पाहिजे. दुसरी महत्वाची बाब सांगतो की या स्कीममध्ये दोनच झोन आहेत आणि ५० एम.एल.डी. पाण्याची व्यवस्था अशी करण्यात आलेली आहे की त्याला डम्पिंगची व्यवस्थित करुन जरी दोन दिवस पाणी आले नाही तरी पाणी असणार आहे. या स्कीममध्ये फक्त दोनच झोन आहेत आणि ते ५० एम.एल.डी. मध्ये गेले होते. परंतु, आजच्या तारखेला बघा. कदाचित अधिका-यांवर आपले नियंत्रण नसेल किंवा अधिकारी जे सांगत असतील तेव्हा तुम्हाला वेळ नसेल म्हणून जर भाईंदर पूर्वेला एवढे झोन ठेवले, भाईंदर पश्चिमेला एवढे झोन ठेवले. आता पुन्हा सन २००४ ची परिस्थिती अशी आहे की.

**मोहन पाटील :-**

मा. पालकमंत्री गणेश नाईकसाहेब विधानसभेत असताना त्यांनी सांगितले होते. आम्हाला पालकमंत्री ज्या पध्दतीने गाईडलाईन्स केल्या. त्याप्रमाणे आम्हाला वेळ होती, अवधी होता. असा अवधी होणार होता. शेवटी काम करण्याचे सर्व अधिकार आमच्या पालकमंत्र्यांनाच आहेत. आमच्या पक्षाचे पालकमंत्री आहेत. त्याच्यामुळे आम्ही त्यांना अधिकार दिलेला आहे. त्यांच्यापरीने ज्या-ज्या सुचना येतील त्या सुचना आम्ही जरुर करु. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे. कृपया आपण एम.जी.पी.च्या प्रस्तावाबद्दल संपूर्ण विषय महासभेपुढे घ्यावा. त्या सर्व अधिका-यांना बोलवावे. आपले कोणते संम्प, पंप बाकी असतील, कुठली लाईन बाकी असेल तर त्याच्यावर पूर्णपणे विचार व्हावा. आम्ही त्याच्यावर पूर्णपणे सहमत आहोत. कृपया, आपण तो विषय घ्यावा. त्या विषयाप्रमाणे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी आपल्या पध्दतीने आपले जे प्रस्ताव आहेत. आपले जे

म्हणणे आहे आणि आपल्याला ज्या सुचना दयायच्या आहेत. त्या सुचनद्वारे या विषयावर प्रभुत्व दयावे अशी मी सन्मा. महापौरांना विनंती करतो. धन्यवाद.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी याच ठरावाला अनुसरुन एक दुरुस्तीचा ठराव मांडतो.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होणेबाबत.

**दुरुस्तीचा ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेला अतिरिक्त १०० द.ल.लि. पाणीपुरवठा होण्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात यावी. सदर योजनेसाठी नवी मुंबई महापालिकेचे स्वतःच्या मालकीच्या मोरबे येथील धरणामध्ये जास्त प्रमाणात ठसलेल्या साठयामधून मिरा भाईंदर महापालिकेसाठी १०० द.ल.लि. पाण्याचा कोटा आरक्षित करण्यात यावा व तसा मागणी प्रस्ताव नवी मुंबई महापालिकेकडे त्यांचे पत्र क्र. नमुंमपा/राअ/काअ(मो/नि) ९९२/२००५ दि. ९/०६/२००५ च्या अनुषंगाने पाठविण्यात यावा असा दुरुस्ती ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रफुल्ल पाटील.** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर.**

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौरसाहेब, वास्तविक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेब जे बोलले त्याच्यामध्ये गैर असे काहीही नाही. कारण मी मागे दशोरेसाहेबांकडे हा विषय उपस्थित केलेला होता. परंतु, त्यावेळेला त्यांनी विषयाला थोडी बगल देउन तो विषय मारुन नेलेला होता. मा. सभापतीसाहेबांनी आपल्याला विनंती केलेली आहे की आगामी सभेपुढे हा विषय घ्यावा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे जे संम्प आणि पंपचे काम सुरु आहे. त्या ठिकाणचे माझ्या इथले एक काम अर्धवट स्थितीत तसेच बंद पडून राहिलेले आहे. हा विषय महासभेत येण्यापूर्वी माझी आपल्याला अशी विनंती आहे की आपण स्टेमच्या अधिकाऱ्यांना आणि आपले जे अधिकारी आहेत. त्यांना अशा संबंधित अधिका-यांची एक बैठक आपल्या दालनामध्ये लवकरात लवकर बोलवावी आणि त्याच्यानंतर त्याच्यावर योग्य तो खुलासा करुन पुढच्या महासभेपुढे आपण हा विषय घ्यावा.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होणेबाबत जो ठराव सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी मांडलेला आहे. तसेच सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलसाहेब आणि सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी मांडलेली सुचना आहे. हयाच्यामध्ये नमुद करुन हा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होणेबाबत.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई शेजारी असून औद्योगिकरणामुळे शहरामध्ये रोजगारानिमित्त येणाया लोकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सन १९९१ साली शहराची लोकसंख्या १.७५ लक्ष वरुन ती सन २००१ साली ५.२७ लक्ष इतकी झाली. यावरुन लोकसंख्या वाढीचा दर सुमारे २०० टक्के एका दशकात झाला आहे. देशातील इतर शहरांच्या तुलनेने लोकसंख्या वाढीचा सरासरी दर केवळ २० टक्के अपेक्षित आहे. आजमितीस शहराची लोकसंख्या ७.५० लाखापेक्षा जास्त असून शहराचे झपाट्याने नागरीकीकरण होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात येऊन तीन वर्षे झाली असून नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा पुरविणेसाठी महानगरपालिका प्रयत्नशिल आहे.

मिरा भाईंदर शहराला स्वतःचा जलस्त्रोत उपलब्ध नाही व निर्माण होणेही नजिकच्या काळात शक्य वाटत नाही. सध्या स्टेम प्राधिकरणामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ८१ द.ल.लि. प्रतिदिन पाणी आरक्षण असून, स्टेम प्राधिकरणाकडून मिळणाया ८१ द.ल.लि. पाण्याचे कौशल्याने व चोख व्यवस्थापन करुन नागरिकांना वितरीत करणेंत येत आहे.

सध्या स्टेम प्राधिकरणाकडून मिळणारे ८१ द.ल.लि. पाणी सद्य स्थितीत नागरिकांना पुरेसे होत असले तरी प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या विचारात घेता, येत्या एक-दोन वर्षात नक्कीच पाणी पुरवठा कमी पडणार असून शहराच्या दृष्टीने ही चिंताजनक बाब आहे. सध्या मिळणारे ८१ द.ल.लि.

पाणी आजच्या ७.५० लक्ष नागरिकांना पुरेसे होत असले तरी सन २०११ मध्ये वाढीव लोकसंख्येसह सुमारे २०० द.ल.लि. व सन २०२६ मध्ये सुमारे २०.०० लक्ष लोकसंख्येसाठी २५६.०० द.ल.लि. पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून वाढीव लोकसंख्येबरोबर जास्तीच्या पाण्याची आवश्यकता असल्याने स्टेम प्राधिकरणाकडे तातडीने अतिरिक्त २५ द.ल.लि. वाढीव पाण्याची मागणी करणेंत आली होती. परंतु, स्टेम प्राधिकरणाकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. तसेच नजीकच्या मुंबई महानगरपालिकेला प्रतिदिन ४००० द.ल.लि. पाण्याची आवश्यकत असतांना सध्या ३००० द.ल.लि. पाणी त्यांचेकडे उपलब्ध असल्याने त्यांचेकडूनही पाणी उपलब्ध होईल असे वाटत नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेने नुकतेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून ४५० द.ल.लि. क्षमतेचे मोरबे धरण मालकी तत्वावर स्वतःकडे घेतले आहे. सदर बाबत सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील व सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर ह्यांनी सुचविले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेला अतिरिक्त १०० द.ल.लि. पाणी पुरवठा होण्यासाठी नविन पाणी पुरवठा योजना हाती घेण्यांत यावी. सदर योजनेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे स्वतःच्या मालकीच्या मोरबे येथील धरणामध्ये जास्त प्रमाणात असलेल्या साठ्यामधून मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी १०० द.ल.लि. पाण्याचा कोटा आरक्षित करण्यांत यावा व तसा मागणी प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेकडे त्यांचे पत्र क्र. नमुंमपा/राअ/काअ(मो/नि)९९२/२००५, दि. ०९/०६/२००५ च्या अनुषंगाने पाठविण्यांत यावा.

सदर कामांची तांत्रिक अनुषांगिक कामे पार पाडणेसाठी सल्लागार नेमण्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच सदर ठरावास महासभा मंजुरी देत असतांना आदरणीय पालकमंत्री मा. ना. श्री. गणेशजी नाईक साहेब यांचे सदर कामी अत्यंत मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे त्यांना ही महासभा खास धन्यवाद देऊन अत्यंत मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे त्यांना ही महासभा खास धन्यवाद देऊन त्यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा करीत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. जयंत पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. १५ मिरा भाईंदर महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून पाणी उपलब्ध होण्याबाबत हया विषयाचा ठराव मंजुर झालेला आहे आणि भरपूर चर्चादेखील हया सभागृहात झालेली आहे. प्रकरण क्र. १४ मध्येसुध्दा महिला व बालकल्याण समितीच्या नउ सन्मा. सदस्यांची निवड झालेली आहे.

**दुःखवटा ठराव क्र. १७(अ) :-**

आज आपल्या कॉंग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते, केंद्रिय क्रिडा मंत्री आमचे आदरणीय स्थान सुनील दत्तसाहेब यांचे अचानक दुःखद निधन झालेले आहे. मी सभागृहामध्ये त्यांच्या दुःखवटयाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे. अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दिनेश नलावडे :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी शोकप्रस्तावासाठी उभे रहायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

सचिवसाहेब, दुःखवटा ठराव मांडायला सभागृहाचे कामकाज चालू आहे. एकतर तुम्हाला तुमचे कर्तव्य बजावायला लागेल. तुम्ही आम्हाला परत-परत बोलायला लावू नका. हे सभागृहाचे कामकाज आहे. कोणी मनात येईल तो उठेल का? श्रध्दांजली, दुःखवटा हे नंतरचे विषय आहेत. त्याला कोणी विरोध करणार नाही. मनात येईल तो विषय घ्यायचा. ही काय कामकाजाची पध्दत आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौरांनासुध्दा बोलले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला या विषयावर बोलायचे आहे. तुम्हाला आम्हाला बोलायला दयायचे नाही.

**मा. महापौर :-**

बोला.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांना फॅक्स आलेला आहे का?

**मोहन पाटील :-**

फॅक्स आला काय बोलता? आम्ही काय केले?

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, सर्वांची सविस्तर चर्चा झालेली आहे. मी सभागृहात आदरांजलीचा ठराव मांडलेला आहे. आपण निर्णय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

पाण्यासारखा विषय आहे. त्याच्यावर सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे.

**दिनेश नलावडे :-**

हया विषयावर सर्वांनी मान्यता दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

आम्ही मा. महापौरांना सांगितले की हया पध्दतीचा विषय तुम्ही परत चर्चेला घ्या. संपूर्ण चर्चा होउ दया ही विनंती आम्ही केलेली आहे. हया विषयावर मा. महापौरांनी विषय घ्यावा. तो संपूर्ण विषय सभागृहात आणावा आणि चर्चा करावी असे आम्ही बोललो.

**रोहिदास पाटील :-**

हे उशीरा आलेले शहाणपण आहे. हे शहाणपण लवकर आले असते तर ते सांगितले असते.

**मोहन पाटील :-**

काय उशीरा आलेले शहाणपण आहे.

**रोहिदास पाटील :-**

अडीच वर्षे सत्ता चालवली तेव्हा तुम्हाला वाटले नाही का?

**मोहन पाटील :-**

तुमच्या लक्षात आले. बस झाले. हरकत नाही. कोणीतरी आशीर्वाद दयावा.

**रोहिदास पाटील :-**

एकतर मोरबे धरणाच्या पाण्याचा विषय आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी आदरांजलीचा विषय मांडून सभा तहकुब करुन आदरांजलीचा विषय घ्यावा. पाण्यावर संपूर्ण सविस्तर चर्चा झालेली आहे. कोणाचा कसला विषय बाकी नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडेसाहेबांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला मी अनुमोदन देत आहे.

**आसिफ शेख :-**

श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी ठराव मांडलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मोरबे धरणातून पाणी मिळावे म्हणून महापालिकेने एकमुखी ठराव दयावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण आता एकविसाव्या शतकात चाललेले आहोत. फॅक्स आलेला नाही. इ-मेल आलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता काय चाललेले आहे. मा. महापौर मॅडम, सगळे कशासाठी उभे राहिलेले आहेत.

**दिनेश नलावडे :-**

क्रिडामंत्री सुनील दत्त यांचे निधन झाल्याबद्दल या ठिकाणी श्रध्दांजलीला उभे रहावे.

**रोहिदास पाटील :-**

सचिवसाहेब, हे काय चाललेले आहे? तुम्ही मला बोलायला परवानगी दिलेली आहे. हे काय चाललेले आहे? ते मला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, गेल्या तीन वर्षाची प्रथा तुम्ही मोडीत काढू नका. मिटींगच्यानंतर श्रध्दांजली असते.

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. विरोधी पक्ष नेते, मा. प्र. सचिव, सर्व नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा तहकूब झाल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०२.०५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**